लोकमत



आदित्य वेल्हाळ

शिवाजी विद्यापीठाच्या सोमवारी होणाऱ्या ५७ व्या वर्धापनदिनानिमित्त शनिवारी सायंकाळी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसह छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ती पाहण्यासाठी विद्यार्थ्यांसह नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# शिवाजी विद्यापीठाचा उद्या वर्धापनदिन

## विविध पुरस्कारांचे वितरण । 'मराठवाडा'चे कुलगुरु उद्धव भोसले यांची प्रमुख उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन उद्या, सोमवारी साजरा होणार आहे. त्यासाठी नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. उद्धव भोसले प्रमुख उपस्थित असणार आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी दिली.

शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होईल. या वर्षीपासून आम्ही विद्यापीठातील एका अधिविभागाला 'उत्कृष्ट अधिविभाग' असा पुरस्कार देणार आहोत. यासाठी अधिविभागाकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यासाठी समिती नियुक्त करून त्यांच्यामार्फत अधिविभागाची निवड केली जाणार आहे. उत्कृष्ट अधिविभागाला निधी दिला जाणार आहे. तो निधी त्यांना अधिविभागातील सोईसुविधांसाठी खर्च करण्याची मुभा दिली जाणार आहे. तसेच विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि शिक्षक, सेवकांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार केला जाणार आहे.

यासह बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक, प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका, प्रशासकीय गुणवत्ता अभियान आणि उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कारांचे वितरण प्रमुख उपस्थितांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी उपस्थित होते.

### प्रतिकृती भेट देणार

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठास भेट देणाऱ्या विविध मान्यवरांसह पाहुण्यांना ही प्रतिकृती आठवण म्हणून भेट दिला जाणार आहे.

### वॉक फॉर बोटॅनिकल गार्डन

शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागाकडून दुर्मीळ, विविध स्वरुपांतील वनस्पतींच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरणारे देशातील पहिले लीड बोटॅनिकल गार्डन (जैवविविधता पार्क) साकारण्यात आले आहे. हे सर्वांना पाहता यावे, यासाठी 'वॉक फॉर बोटॅनिकल गार्डन' या उपक्रमाचे उद्घाटन उद्या, सोमवारी होणार आहे. यामध्ये कोणालाही सहभागी होता येणार आहे. हा उपक्रम प्रत्येक महिन्याच्या रविवारी राबविला जाणार आहे. यातील प्रत्येक वनस्पतीबद्दल सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

लोकमत



# विद्यापीठाची ठळक कामगिरी

- सेंटर फॉर व्ही.एल.एस.आय. डिझाईन या केंद्राच्या माध्यमातून संरक्षण खात्याला 'आय.आर.एन.एस.एस.' प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या काही अत्यंत गुंतागुंतीच्या आणि महत्त्वाच्या चिप्स बनविण्याचे काम विद्यापीठात करण्यात येणार आहे.
- विद्यापीठात प्रशिक्षित प्रशासकीय मनुष्यबळ निर्मिती व सक्षमीकरणासाठी स्वतंत्र 'अकॅडमी फॉर अकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेटर्स'ची स्थापना केली आहे.
- लोकसहभागातून निधी संकलित करून उच्च शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी बस पास योजना जाहीर केली.
- सर्व अधिकार मंडळांच्या बैठकांचे कामकाज पूर्णत: ऑनलाइन पद्धतीने सुरु आहे.
- 'जलयुक्त विद्यापीठ' योजनेद्वारे कॅम्पसवरील पावसाच्या पाण्याची साठवणूक करून पाण्यावरील खर्चात बचत.
- परीक्षा विभागाकडून सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी (एस.आर.पी.डी.) या ई-मोडद्वारे चार हजारांहून अधिक प्रश्नपत्रिकांचे वितरण केले जाते.
- सर्व निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर केले जातात.
- शिक्षक आणि संशोधक विद्यार्थी यांच्यासाठी 'रिसर्च सेन्सिटायझेशन ग्रँट' आणि 'रिसर्च इनिसिएशन ग्रँट' या योजना सुरु केल्या आहेत.

## दृष्टिक्षेपात

**संलग्नित महाविद्यालयांची संख्या :** २९३

**संलग्नित संशोधन संस्था :** १३

**स्वायत्ततेचा दर्जा मिळालेली महाविद्यालये :** १२

**विद्यापीठातील अधिविभाग :** ३३

**अभ्यास व संशोधन केंद्रे :** १४

**अध्यासने :** १०

**विद्यार्थी संख्या :** सुमारे तीन लाख

**दूरशिक्षण केंद्राद्वारे शिक्षण घेणारे विद्यार्थी :** सुमारे १७ हजार

लोकमत

संडे स्पेशल

# शिक्षण, संशोधनात शिवाजी विद्यापीठाचे पाऊल पडते पुढे

## ५७ व्या वर्षात पदार्पण । आंतरराष्ट्रीय पातळीवर लौकिक, 'एच इंडेक्स'मध्ये ९२ वे स्थान

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संशोधनातील 'एच इंडेक्स'मधील पहिल्या १०० संस्थांमधील स्थान, युरोपियन युनियनच्या 'इरॅस्मस प्लस' उपक्रमातील सहभाग, फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर इन सायबर सिक्युरिटी अँड डाटा सायन्सेसच्या स्थापनेमुळे शिवाजी विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय पातळीवर नवी ओळख निर्माण होत आहे. वर्षागणिक विद्यापीठाचे शिक्षण, संशोधन क्षेत्रांत पाऊल पुढे पडत आहे. दक्षिण महाराष्ट्राचे ज्ञानकेंद्र असलेले विद्यापीठ सोमवारी (दि. १८) ५७ व्या वर्षामध्ये पदार्पण करीत आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या वाटचालीचा 'लोकमत'ने आढावा घेतला.

विद्यापीठातील विविध अधिविभागांतील प्राध्यापकांना देशातील विविध वित्तीय शिखर संस्थांकडून गेल्या वर्षभरात सुमारे १४ कोटी २१ लाख ७७ हजार ७२ रुपये इतका निधी मंजूर झाला आहे. राष्ट्रीय स्तरावरील संशोधनाबाबत भारतातील विद्यापीठांचे जे मूल्यांकन झाले, त्यामध्ये विद्यापीठाचा 'एच' इंडेक्स ९२ राहिला आहे. क्यू. एस. ब्रिक्स इंडिया रँकिंगमध्ये भारतातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० अशी आहे; तर 'ब्रिक्स' देशांतील शैक्षणिक संस्थांमध्ये ही क्रमवारी २५१-२६० अशी आहे. युरोपियन युनियनच्या 'इरॅस्मस प्लस' या उपक्रमांतर्गत युरोपियन युनियन आणि भारत यांच्यात आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यामध्ये विद्यापीठाचा समावेश आहे. विद्यापीठ कॅम्पसवर उच्च शिक्षणासाठी दाखल झालेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची संख्या आता २५ झाली आहे. त्यांच्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे वसतिगृह उभारले आहे. देशातील पहिले आणि एकमेव असे फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर इन सायबर सिक्युरिटी अँड डाटा सायन्सेस मंजूर झाले आहे. त्याद्वारे 'नॅसकॉम'च्या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत गेल्या चार महिन्यांत देशभरातील ५०० हून अधिक शिक्षकांना प्रशिक्षित केले आहे. विद्यापीठामध्ये महाराष्ट्र राज्य इनोव्हेशन सोसायटीच्या सहकार्यातून 'इन्क्युबेशन अँड इनोव्हेशन सेंटर' कार्यान्वित केले आहे. याअंतर्गत कोल्हापुरी चप्पलसारख्या जागतिक ख्यातीच्या उपक्रमाला क्लस्टरच्या माध्यमातून गती व ऊर्जा प्रदान करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंतर्गत विद्यापीठाला सेंटर फॉर नॅनो-फॅब्रिक्स आणि सेंटर फॉर व्ही.एल.एस.आय. डिझाईन मंजूर झाली आहेत. सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आधुनिक कापड निर्मितीच्या अनुषंगाने संशोधन करण्यात येणार आहे. विद्यापीठाला 'आय.एस.ओ.' हे आंतरराष्ट्रीय मानांकन मिळाले आहे. विद्यापीठाची वाटचाल दक्षिण महाराष्ट्रातील विद्यार्थी आणि उच्च शिक्षणक्षेत्राला बळ देणारी आहे.

### ६५०० जणांना विविध कौशल्ये

गेल्या वर्षी घेतलेल्या महारोजगार व कौशल्य मेळाव्यात सुमारे १२२ कंपन्या सहभागी झाल्या. त्यांनी ९५३९ पदांसाठी नोंदणीकृत २३ हजार इच्छुक उमेदवारांपैकी १७ हजार २६९ जणांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून सुमारे साडेपाच हजार उमेदवारांना रोजगार प्राप्त झाला. ६५०० उमेदवारांना विविध कौशल्ये मोफत देण्यात आली.



उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, संशोधनातून उद्योगनिर्मिती, नावीन्यपूर्ण आणि अभिनव संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि भविष्यवेधी अभ्यासक्रम या पंचसूत्रीचा आधार घेऊन विद्यापीठाची वाटचाल सुरु आहे. दक्षिण महाराष्ट्राच्या उच्च शैक्षणिक उत्थानासाठी विद्यापीठाने गेल्या ५६ वर्षांत अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. प्रत्येक कुलगुरुंच्या परिश्रमांचे, दूरदृष्टीचे फलित म्हणूनच विद्यापीठाचा लौकिक आंतरराष्ट्रीय पातळीवर झाला आहे.

\- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

लोकमत

संडे अँकर । राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात आयोजन, विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रतिसाद

# शिवाजी विद्यापीठ परिसर छायाचित्रांचे प्रदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात शनिवारी विद्यापीठ परिसर छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. दिवसभरात या प्रदर्शनाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्साही प्रतिसाद लाभला.

प्रदर्शनात १२४ स्पर्धकांच्या सुमारे ६०० छायाचित्रांची आकर्षक मांडणी करण्यात आली होती. विद्यापीठातील विविध इमारती, जैवविविधता, जलसाठे, नैसर्गिक सौंदर्य, आदी अनेक पैलूंचे दर्शन या प्रदर्शनाद्वारे घडते आहे. प्रदर्शन आज, रविवारपर्यंत सुरु राहणार आहे.

या उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उद्यान अधीक्षक अभिजित जाधव, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात शनिवारी आयोजित विद्यापीठ परिसरातील छायाचित्रांचे प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

## शुभम व संकेत विजेता

स्पर्धेमध्ये शुभम रमेश हत्तरकी आणि संकेत उदय साळी या दोघांना प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला आहे. त्यांना प्रत्येकी १२,५०० रुपये रोख व प्रमाणपत्र, स्पर्धेतील द्वितीय व तृतीय क्रमांकही विभागून देण्यात आले आहेत. सुंदरकुमार कांबळे व सुभाष पोपटराव वाणी यांना विभागून द्वितीय क्रमांक देण्यात आला. त्यांना ७५०० रुपये रोख व प्रमाणपत्र, उदयणादित्य एस. पाटील व युवराज जगन्नाथ जगताप यांना विभागून तृतीय क्रमांक देण्यात आला.

लोकमत

# कुलगुरू चषक टी-२० उद्यापासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात अखिल भारतीय कुलगुरू चषक कर्मचारी टी-२० लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, स्पर्धेचे उद्‌घाटन उद्या, सोमवारी दुपारी एक वाजता विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडासंकुलाच्या मैदानावर होणार आहे. नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

या स्पर्धा २९ नोव्हेंबरपर्यंत चालणार असून, शिवाजी विद्यापीठातील दोन व राजाराम महाविद्यालयाचे एक अशा एकूण तीन क्रीडांगणांच्या टर्फ विकेटवर ती घेण्यात येणार आहे.

# डॉ. ए. डी. जाधव जपानला रवाना

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. ए. डी. जाधव

टोकियो (जपान) येथे १९ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय रेशीम परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागाचे डॉ. ए.डी.जाधव रवाना झाले. डॉ. जाधव या परिषदेत 'रेशीम कीटक संगोपनासाठी अद्ययावत कीटक संगोपन गृह आणि त्यांचा वाढीव कोश उत्पादनासाठी होणारा फायदा' या विषयावर व्याख्यान देणार आहेत.

डॉ. जाधव हे राज्याच्या वस्त्रोद्योग विभागाच्या रेशीम सल्लागार समिती तसेच राज्य जैवविविधता मंडळाचेही सदस्य आहेत. क्युबा देशाचे ते रेशीम शेती सल्लागारही आहेत. जपान येथील आंतरराष्ट्रीय परिषदेसह ते तेथील विविध रेशीम संशोधन संस्थांना भेटी देणार आहेत. शिवाजी विद्यापीठात प्राणीशास्त्र विभागातील रेशीमशास्त्र इन्क्युबेशन केंद्राअंतर्गत रेशीम प्रशिक्षण देण्याबाबतही चर्चा होणार आहे. जगभरातील ३५ देशांतील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ परिषदेत सहभागी होत आहेत.

पुढारी

# सॉफ्टबॉल स्पर्धेत महावीर, शहाजी कॉलेज अंतिम फेरीत

**कसबा बावडा : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेत महावीर महाविद्यालय व शहाजी कॉलेज यांनी अंतिम फेरीत धडक मारली आहे. महावीर महाविद्यालयाकडे संयोजन असणाऱ्या या स्पर्धेचे उद्‌घाटन ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सचिव मालोजीराजे भोसले व आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडिगिरी यांच्या हस्ते झाले.

स्पर्धेत कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यांतून १२ महाविद्यालयांनी भाग घेतला असून या स्पर्धेतून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष सॉफ्टबॉल संघाची निवड करण्यात येणार आहे.



**कसबा बावडा : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष गट सॉफ्टबॉल स्पर्धेचे उद्‌घाटन करताना मालोजीराजे भोसले. शेजारी डॉ. रमेश भेंडिगिरी, डॉ. बाबासो उलपे, डॉ. रोहित पाटील आदी.**

शनिवारी पहिल्या उपांत्य पूर्व फेरीच्या सामन्यात महावीर महाविद्यालयाने रामानंदनगर महाविद्यालयाचा तसेच शहाजी कॉलेजने बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण या संघाचा एकतर्फी पराभव केला. रविवारी सकाळी शहाजी कॉलेज विरुद्ध महावीर कॉलेज असा अंतिम सामना होईल तर बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण विरुद्ध रामानंदनगर कॉलेज यांच्यात तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकासाठी सामना होईल.



शिवाजी विद्यापीठातून

यावेळी विद्यापीठ संघ निवड समितीचे सदस्य प्रा. संदेश दौंडे, डॉ. हेमंत नारायणकर व प्रा. विलास डाफळे, डॉ. दीपक डांगे-पाटील, प्रा. संजय पाटील, प्रा. वसंत पाटील, प्रा. महादेव सूर्यवंशी आदी उपस्थित होते. स्पर्धेचे संयोजन महावीर महाविद्यालयाच्या डॉ. बाबासो उलपे, डॉ. रोहित पाटील, प्रा. स्वप्निल खोत यांनी स्पर्धेचे संयोजन केले.

# कलाकारांनी सृजनशीलता जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; विद्यापीठ परिसर छायाचित्र स्पर्धेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने घेतलेल्या परिसर छायाचित्रण स्पर्धेला सर्वच स्तरातून प्रतिसाद लाभत आहे. स्पर्धेत सहभागी प्रत्येक छायाचित्र व त्याचा छायाचित्रकार हा विजेता आहे. प्रत्येक कलाकाराने सर्जनशीलता जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात शिवाजी विद्यापीठ परिसर छायाचित्रण स्पर्धेस शनिवारपासून (दि. १६) प्रारंभ झाला. प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, प्रत्येक सहभागी स्पर्धकाने मनापासून व प्रेमाने छायाचित्रे काढली आहेत. त्यांची आस्था ही पाहणाऱ्याच्या नजरेतून थेट हृदयामध्ये प्रवेश करते.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिक डॉ. नमिता खोत, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उद्यान अधीक्षक अभिजित जाधव उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसर छायाचित्र स्पर्धेतील छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. डी. राऊत आदी.**
**(छाया : नाज ट्रेनर)**

**आजही सुरू राहणार प्रदर्शन...**

छायाचित्रण स्पर्धेत सहभागी झालेल्या १२४ स्पर्धकांच्या सुमारे ६०० छायाचित्रांची आकर्षक मांडणी प्रदर्शनात करण्यात आली आहे. विद्यापीठातील विविध इमारती, जैवविविधता, जलसाठे, नैसर्गिक सौंदर्य आदी अनेक पैलूंचे दर्शन यातून घडते. रविवारपर्यंत (दि. १७) प्रदर्शन सुरू राहणार आहे.

### शुभम हत्तरकी, संकेत साळी प्रथम

छायाचित्रण स्पर्धेचा निकाल कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी जाहीर केला. शुभम हत्तरकी व संकेत साळी यांना प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला. सुंदर कांबळे व सुभाष वाणी यांना द्वितीय क्रमांक, तर उदयणादित्य पाटील व युवराज जगताप यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. विजेत्यांना सोमवारी (दि.१८) सकाळी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिन समारंभात पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

# विद्यापीठात अ. भा. कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा उद्यापासून

## देशभरातील २० संघांचा समावेश; १० दिवस ४८ सामन्यांचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून (दि. १८) १७ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन दुपारी १ वाजता विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, टी-२० क्रिकेट स्पर्धा २९ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. विद्यापीठाच्या दोन व राजाराम महाविद्यालयाचे एक अशा तीन क्रीडांगणावर स्पर्धा होतील. स्पर्धेसाठी देशातील २० संघांनी सहभाग नोंदविला आहे. यात महाराष्ट्रातील आठ विद्यापीठांच्या संघांसह पंजाब येथील तीन, जम्मू-काश्मीर येथून तीन, हरियाणातून दोन, राजस्थान, दिल्ली, हिमाचल प्रदेश व उत्तर प्रदेश येथून प्रत्येकी एक असे विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे संघ सहभागी होणार आहेत.

### स्पर्धेचे अपडेट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर

शिवाजी विद्यापीठाला पहिल्यांदाच यजमानपद भूषविण्याचा बहुमान मिळाला आहे. स्पर्धेचे अपडेट विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील वेबपेजवर दिले जाणार आहे. स्पर्धेच्या निमित्ताने २१ नोव्हेंबर रोजी ॲम्पी थिएटर येथे विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम व व्हाईस चॅन्सलर डिनरचे आयोजन करण्यात आले आहे. २०२० व २०२१ ला अनुक्रमे मुंबई व जम्मू विद्यापीठांकडे स्पर्धेचे यजमानपद असणार आहे, असे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.




प्रत्येक संघात १५ खेळाडू, एक प्रशिक्षक व एक संघव्यवस्थापक अशा १७ जणांचा समावेश आहे. स्पर्धेसाठी येणाऱ्या २० संघांचे ३४० जणांच्या निवास व भोजन व्यवस्थेसह स्पर्धा कालावधीत मैदानांवर ने-आण करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने विशेष सोय केली आहे. स्पर्धा 'बीसीसीआय'च्या विहीत नियमावलीनुसार घेण्यात येणार आहे. स्पर्धांसाठी पंच व्यवस्था महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनद्वारा नोंदणीकृत, कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन संलग्नित पंच असोसिएशनमार्फत करण्यात आली आहे.

स्पर्धेअंतर्गत दहा दिवसांत ४८ सामने होणार आहेत. त्यामध्ये चार गटांतर्गत साखळी पद्धतीने व तद्नंतर उपांत्यपूर्व, उपांत्य व अंतिम सामना असे खेळविण्यात येणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना एकत्रित व वैयक्तिक बक्षिसे चषक स्वरूपात विद्यापीठामार्फत देण्यात येणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, विशांत भोसले, सांख्यिकी अधिकारी अभिजित रेडेकर उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा व मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : पप्पू अत्तार)

## गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, प्राचार्यांचा होणार सन्मान

# शिवाजी विद्यापीठाचा उद्या वर्धापन दिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन समारंभ सोमवार (दि.१८) रोजी सकाळी राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ८.३० वाजता होणार आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू प्रा. डॉ. उद्धव भोसले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असेल. समारंभात विद्यापीठातील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता




संपादन केलेली पाल्ये, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीबाई पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षक, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार प्राप्त विभाग प्रदान करण्यात येणार आहेत. उत्कृष्ट दोन अधिविभागांना १० लाख रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. अति विशिष्ट महत्त्वाच्या मान्यवरांना छत्रपती शिवाजी महाराज यांची अश्वारूढ प्रतिकृती भेट देण्यात येणार आहे.

### ‘वॉक थ्रू लीड बॉटेनिकल गार्डन’ उपक्रम

शिवाजी विद्यापीठ वर्धापनदिनाच्यानिमित्ताने ‘वॉक थ्रू लीड बॉटेनिकल गार्डन’ या उपक्रमाचे प्रतीकात्मक उद्‌घाटन होणार आहे. पश्चिम घाटातील दुर्मीळ वनस्पती, झाडांच्या सुमारे ११०० प्रजाती या गार्डनमध्ये आहेत. गार्डनमधील नैसर्गिक जैवविविधता विद्यार्थी, शिक्षक, नागरिकांना पाहता येणार आहेत. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी हे सर्वांना पाहण्यासाठी खुले असणार आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघालेली मुख्य इमारत.

# अखिल भारतीय कुलगुरू चषक उद्यापासून

कोल्हापूर, ता. १६ : क्रीडा क्षेत्रात प्रतिष्ठेची मानली जाणारी अखिल भारतीय कुलगुरू चषक कर्मचारी टी -२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन यंदा शिवाजी विद्यापीठात केले आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन सोमवारी (ता. १८) दुपारी १ वाजता स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड यांच्या हस्ते होईल. स्पर्धा २८ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे, अशी माहिती कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये दिली.

स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील आठ विद्यापीठांच्या संघांसह पंजाब येथील तीन, जम्मू-काश्मीर येथून तीन, हरियाणातून दोन, राजस्थान, दिल्ली, हिमाचल प्रदेश व उत्तर प्रदेश येथून प्रत्येकी एक असे विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे संघ स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या संघांमध्ये विद्यापीठातील विविध पदांवर काम करणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकाऱ्यांचा सहभाग असणार आहे. प्रत्येक संघात खेळाडू, एक प्रशिक्षक व एक संघव्यवस्थापक अशा एकूण १७ जणांचा समावेश आहे. त्यानुसार स्पर्धेसाठी दाखल होणाऱ्या २० संघांच्या ३६० जणांच्या निवास व भोजन व्यवस्थेसह स्पर्धा कालावधीत मैदानांवर ने-आण करण्यासाठी विद्यापीठाने विशेष सोय केलेली आहे.

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'ही स्पर्धा विद्यापीठात होणे ही अभिमानाची बाब आहे. गुरुवारी (ता. २१) स्पर्धकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.'

क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड म्हणाले, "पावसामुळे सर्वच मैदाने खराब झाली होती; पण या स्पर्धेसाठी तयारी करून विद्यापीठातील दोन आणि राजाराम महाविद्यालयाचे एक मैदान तयार केले आहे. २० संघांची विभागणी चार गटात केली असून प्रत्येक संघ साखळी फेरीत चार सामने खेळेल. एकूण ४६ सामने होणार आहेत. स्पर्धांसाठी पंच व्यवस्था महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनद्वारा नोंदणीकृत तसेच, पंच असोसिएशनतर्फे केले आहे."

पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, विशांत भोसले, सांख्यिकी अधिकारी अभिजित रेडेकर यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

### संकेतस्थळावर अपडेट

स्पर्धेच्या रोजच्या सामन्यांची माहिती, गुण, वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल. त्यामुळे जगभरातून कोठूनही या सामन्यांची माहिती तत्काळ सर्वांना समजणार आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

# विद्यापीठ छायाचित्रण स्पर्धेत हत्तरगी, साळी प्रथम

## कांबळे, पोपटराव द्वितीय; तर पाटील, जगताप तृतीय

**कोल्हापूर, ता. १६ :** शिवाजी विद्यापीठाने खुल्या छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन केले होते. यात विद्यापीठ परिसरातील छायाचित्रण करायचे होते. स्पर्धेत शुभम हत्तरगी आणि संकेत साळी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सुंदरकुमार कांबळे आणि सुभाष पोपटराव यांनी द्वितीय क्रमांक विभागून देण्यात आला. तृतीय क्रमांकही अदयाणादित्य पाटील, युवराज जगताप यांना विभागून देण्यात आला. स्पर्धेतील छायाचित्रांचे प्रदर्शन विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात आजपासून सुरू झाले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी या प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले.

स्पर्धेत १२४ स्पर्धकांनी सहभाग घेतला असून ६०० छायाचित्रे दिली होती. प्रदर्शनाचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. हे प्रदर्शन रविवार (ता. १७) पर्यंत सर्वांना विनामुल्य पाहता येणार आहे. स्पर्धेमध्ये शुभम रमेश हत्तरकी आणि संकेत उदय साळी या दोघांना प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला. त्यांना प्रत्येकी १२ हजार ५०० रोख रक्कम, प्रमाणपत्र असे पारितोषिक देण्यात येईल.

स्पर्धेतील द्वितीय व तृतीय क्रमांक सुंदरकुमार कांबळे व सुभाष पोपटराव वाणी यांना विभागून देण्यात आला. त्यांना सात हजार पाचशे रुपये रोख व प्रमाणपत्र असे पारितोषिक मिळणार आहे. उदयणादित्य एस. पाटील व युवराज जगन्नाथ जगताप यांना विभागून तृतीय क्रमांक देण्यात आला. त्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये रोख व प्रमाणपत्र मिळेल. उपरोक्त विजेत्यांना सोमवारी (ता. १८) सकाळी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिन समारंभात पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार असून अन्य स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र ई-मेलद्वारे पाठविण्यात येणार आहे.

उद्‌घाटन प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. नमिता खोत, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. व्ही.एन. शिंदे, अभिजीत जाधव आदी उपस्थित होते.

> **“ या छायाचित्रांनी विद्यापीठाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. निसर्गवैभव, जैवविधता यांनी समृद्ध असणारा विद्यापीठ परिसर या प्रदर्शनातून अधिक सखोलपणे उलगडतो.**
> **- प्रा. डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2019
तरूण भारत

# विद्यापीठाकडून पाहुण्यांना शिवरायांच्या पुतळ्याची प्रतिकृती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन सोमवार १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. वर्धापनदिनी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याची छोटी प्रतिकृती तयार करणाऱ्या कलाकारांचा सत्कार करण्यात येणार आहे. विद्यापीठात येणाऱ्या पाहुण्यांना गुलाबपुष्प देण्याऐवजी आता छत्रपती शिवाजी महाराज यांची अश्वारूढ पुतळा असलेली प्रतिकृती भेट दिली जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती**

शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त अधिविभागांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या अधिविभागाला १० लाख रूपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. विद्यापीठात यापूर्वी आलेल्या पाहुण्यांना किंवा कोणत्याही स्पर्धेतील विजेत्यांना पुस्तक देऊन गौरवण्यात येत होते. यापुढे मात्र छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची छोटी प्रतिकृती देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

सोमवारी सकाळी ८.३० वाजता ध्वजवंदनाने या कार्यक्रमाला सुरूवात होईल. त्यानंतर सत्काराचा कार्यक्रम मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात होईल. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक, सेवक, कर्मचारी आदिंनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
17 NOV 2019
तरुण भारत

# विद्यापीठात एक हजार दुर्मीळ वनस्पतींचे संवर्धन

## राज्यातील पहिले ४२ एकर परिसरातील 'वॉक थ्रू लीड बोटॅनिकल गार्डन'

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात देशातील तिसरे व राज्यातील पहिले लीड बोटॅनिकल गार्डन ४२ एकर परिसरात फुलले आहे. या गार्डनमध्ये पश्चिम घाटातील १ हजार १२० दुर्मीळ वनस्पतींचे संवर्धन केले जाते. या वनस्पतींची माहिती समाजातील सर्वच स्तरातील व्यक्तींना व्हावी, यासाठी विद्यापीठाकडून 'वॉक थ्रू लीड बोटॅनिकल गार्डन' हा उपक्रम सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमात सर्वसामान्यांना विद्यापीठात अगदी सहजपणे चालत चालत, हिंडत फिरत दुर्मीळ वनस्पती पाहता येणार आहेत. त्यातून ज्ञानसंचय करता येणार आहे.

वनस्पतीशास्त्र विभागातील लीड बोटॅनिकल गार्डन जैवविविधतेने नटल्याने या गार्डनचा बोलबाला देशभर आहे. या गार्डनमध्ये देश-विदेशातील अकराशे प्रजातींचे संवर्धन केल्याने, अख्खा पश्चिम घाटच अवतरला आहे. त्यामुळे संशोधक प्रकल्पाअंतर्गत भारतातील एक नंबरचे जैवविविधसंपन्न गार्डन म्हणून देशभर या गार्डनची ओळख आहे. संशोधक डॉ. एस. आर. यादव यांच्या प्रयत्नामुळे जागतिक पातळीवर या गार्डनमधील जैवविविधतेची किर्ती पोहोचली आहे. या औषधी व दुर्मीळ वनस्पतींचे संवर्धन करण्यासाठी विभागातील विद्यार्थी, संशोधक प्राध्यापकांचे मोठे योगदान आहे.

### उद्या 'वॉक थ्रू लीड बोटॅनिकल' उपक्रमाचे उद्घाटन



शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र अधिविभागांतर्गत 'वॉक थ्रू लीड बोटॅनिकल' या उपक्रमाचे उद्घाटन सोमवार, १८ नोव्हेंबर रोजी होणार आहे. समाजातील सर्वस्तरातील लोकांनी या गार्डनमधील दुर्मीळ वनस्पतींची माहिती घ्यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

निलांबरी, खारफुटी, कडूनिंब, आवळा, व्हिक्टोरिया, आंबा, जांभूळ, दुर्वा, बार्लेरिया, वेगवेगळ्या रंगांची फुले, जिम्नोस्कॉम, एरंड, सदाफुली, केरळ कमळ, क्रायनम ब्राचीनेमा, मकरंदा पेळटाटा, कोदले पुष्प, वान टेलिडोफाईटस, कंदील पुष्प, पिचर प्लांट, केरळमधील निलुंबिचे फुल, डायोनिया फेनस, अशा १ हजार १२० वनस्पती फुलल्या आहेत.

कोल्हापूरला येणारे पर्यटक शिवाजी विद्यापीठाला भेट दिल्याशिवाय जात नाहीत. त्यामुळे या पर्यटकांना प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी 'वॉक थ्रू लीड बोटॅनिकल गार्डन' अंतर्गत ५० रूपये शुल्क आकारून जैवविविधतेची माहिती दिली जाणार आहे. तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी ५ रूपये, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी १० रूपये, संशोधकांसाठी १५ रूपये शुल्क आकारले जाणार आहे. पर्यटकांनी अगोदर वनस्पतीशास्त्र विभागात नावनोंदणी करणे आवश्यक आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांना मात्र नेहमीप्रमाणे वनस्पतींची माहिती दिली जाईल. यातून वनस्पतीशास्त्र विभागाच्या उत्पन्नात वाढ होईल, या उत्पन्नाचा खर्च गार्डनची देखभाल करण्यासाठी केला जाईल.

या वनस्पतींचा मानवी जीवनात होणाऱ्या फायद्यांचा प्रचार आणि प्रसारदेखील होईल, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. हा उपक्रम ज्येष्ठ संशोधक डॉ. एस. आर. यादव आणि विभागप्रमुख डॉ. वर्षा जाधव (राठोड) यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येणार आहे.

### विद्यापीठातील संवर्धित दुर्मीळ वनस्पतींची संख्या

| | |
|---|---|
| पाम | १११ |
| ऑर्किड | ८१ |
| कंदमुळ | ८२ |
| फर्नरी नेचेवर्गीय | ६३ |
| खारफुटी | २७ |
| औषधी वनस्पती | १५० |
| दुर्मीळ | ११८ |
| पाण्यातील | १५ |
| जांभळाच्या | ५ |
| अनोलेसी | ७ |
| ॲकलपिडे | १० |
| कंदीलपुष्प | १८ |
| नवीन प्रजाती | ६५ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ
17 NOV 2018
तरुण भारत

# कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्या उद्घाटन

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : देशभरातील २० विद्यापीठांच्या संघांचा सहभाग

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सोमवार (१८)पासून अखिल भारतीय कुलगुरू चषक कर्मचारी टी-२० लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धा विद्यापीठातील क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर होणार आहे. दुपारी १ वाजता नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, यापुर्वी १७ विद्यापीठांमध्ये या स्पर्धा झाल्या आहेत. यंदा शिवाजी विद्यापीठाला यजमानपद भूषविण्याचा बहुमान मिळाला असून, या स्पर्धा २९ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहेत. शिवाजी विद्यापीठातील दोन व राजाराम महाविद्यालयाचे एक अशा तीन क्रीडांगणावर या स्पर्धा होतील. यासाठी भारतातील एकूण २० संघांनी सहभाग नोंदविला असून त्यामध्ये महाराष्ट्रातील आठ विद्यापीठांच्या संघांसह पंजाब, जम्मू-काश्मीर, हरियाणा, राजस्थान, दिल्ली, हिमाचल प्रदेश व उत्तर प्रदेशच्या विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे संघ स्पर्धेत सहभागी होणार आहेत.